## आपटा पाने संकलन

१. महाराष्ट्र वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम १९६९ मधील तरतूदीनुसार सन १९७७-७८ पासून आपटा पानाच्या घटकांची विक्री व खरेदीची एकमुस्त पध्दत प्रमाणे करण्यात येत आहे. महाराष्ट्रात आपटा पानाचे उत्पादन हे धुळे, नाशिक, ठाणे, पुणे व कोल्हापूर या वनवृत्तात होत असते. या पाचही वनवृत्तात एकूण ६६ आपटा घटक आहेत. सदर घटकांची विक्रीकरिता वृत्तपत्रात जाहीरात देऊन एकमुस्त रक्कमेचा निविदा मागवून योग्य रक्कमेचा निविदेस मंजूरी दिल्या जाते. विक्रची प्रक्रिया ही ठाणे येथे आयोजित केली जाते. आपटा घटकांची खरेदी करणारे खरेदीदार हे मजुरांना शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार मजुरी अदा करतात. स्वामित्व शुल्क व कर शासनास भरणा केल्यानंतर परवानाधारक आपटा पाने घेऊन जातात.

सन २०१४ आपटा हंगामाकरीता शासनानी मंजूर केलेल्या पाने संकलन/खरेदी दर खालील प्रमाणे आहे.

| वनवृत्त | वनविभाग | आपटा घटक | शासकिय भूमीतून संकलन (प्रति क्विंटल) | खाजगी भूमीतून खरेदी (प्रति क्विंटल) |
|---|---|---|---|---|
| ठाणे | ठाणे,शहापूर, डहाणू, अलिबाग | सर्व घटक (डहाणू क्र.१,२ व ४ तसेच रोहा वनविभाग सोडुन सर्व घटक) | रू.१०५५ | रू.११६३ |
| नाशिक,पुणे, कोल्हापूर व धुळे | सर्व वनविभाग | सर्व घटक | रू.१०५५ | रू.११६३ |
| ठाणे | डहाणू<br>रोहा | घटक क्र. १,२ व ४<br>सर्व घटक | रू.११५८ | रू.१२६५ |

२. विक्री करीता ठेवण्यात आलेल्या घटक/घटक समूह, उत्पादन प्राप्त महसूल तसेच अविक्रित राहिलेल्या घटकाबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हंगाम | विक्रीस ठेवलेल्या घटकांची संख्या | विक्री झालेल्या घटकांची संख्या | अविक्रित घटकांची संख्या | प्रत्यक्ष उत्पादन क्विंटल मध्ये | एकूण महसूल रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| २००९ | ६६ | ३३ | ३३ | ४१२.०५ | २,३७,०४७ |
| २०१० | ६६ | ४५ | २१ | ५१८.०० | ३,८७,८०० |
| २०११ | ६६ | ४६ | २० | ३५७ | ४,६९,४६४ |
| २०१२ | ६६ | ५० | १६ | ३२१ | ५,२२,११५ |
| २०१३ | ६६ | १८ | ४८ | ४२३ | ३,३७,०५८ |
| २०१४ | ६६ | सन २०१४ आपटा हंगाम लिलावाची प्रक्रिया सुरु आहे. | | | |

*-*-*-*-*